KAWISH

# एस.एस.सी.

# मराठी विषय मार्गदर्शिका

## व्याकरण व उपयोजित लेखनाच्या तयारी व सरावासाठी खास तयार केलेली मार्गदर्शिका




मार्गदर्शक:

**मुनव्वर मलिक** (मुंबई)

9768205400





विशेष सहयोग:

**मोहियुद्दीन शेख** (मालेगाव)

9226341918


नोट: या मार्ग्दर्शिकेतील तयारी व सराव कशाप्रकारे करावा. या साठी माझे यु ट्यूब चैनल E-Guidance ला सबस्क्राइब करा. किंवा खालील लिंक वर जा.

https://www.youtube.com/channel/UCTTgZOADnilVlvUBwtlrsiw

E-GUIDANCE

**काळ ओळखा.** **गुण: ०१**

| अ क्र | वाक्य | सराव | उत्तर |
|---|---|---|---|
| १. | शाळेसमोर एक छान भलंमोठं चाफ्याचं झाड होतं. | | भूतकाळ |
| २. | दुसऱ्या दिवशी ते मला शाळेत घेऊन गेले. | | भूतकाळ |
| ३. | शिकलेले कधीच विसरता आले नाही. | | वर्तमानकाळ |
| ४. | आता दिंडी नावाची चिमणी उडून जाणार. | | भविष्यकाळ |
| ५. | माझ्या सासरी शिक्षणाचा गंधही नव्हता. | | भूतकाळ |
| ६. | अलीला एक तान्हुले भावंडे आहे. | | वर्तमानकाळ |
| ७. | ही भावंडे काही पथ्य कटाक्षाने पाळतात. | | वर्तमानकाळ |
| ८. | आपल्याला बुटांची जोडी बक्षीस म्हणून मिळणार. | | भविष्यकाळ |
| ९. | तो कमालीचा निराश झाला. | | भूतकाळ |
| १०. | त्याला जवळपास भोवळ येते. | | वर्तमानकाळ |
| ११. | त्याला भेटल्या शिवाय मला करमत नाही. | | वर्तमानकाळ |
| १२. | या विचाराने त्याचेही मन गलबलून गेले असेल. | | भविष्यकाळ |
| १३. | ब्रिस्केत हेलकावत माझ्या अभ्यासिकेत प्रवेश करतो. | | वर्तमानकाळ |
| १४. | आपल्या नाजूक बोटाने त्यानेच मला सावरले आहे. | | वर्तमानकाळ |
| १५. | आदर्श प्राध्यापक म्हणून माझा गौरव झाला. | | भूतकाळ |
| १६. | बराच शोध घेऊनही काही केल्या सापडत नव्हतं. | | भूतकाळ |
| १७. | नवनवे बदल निसर्ग स्वीकारतो. | | वर्तमानकाळ |

| अ क्र | वाक्य | सराव | उत्तर |
|---|---|---|---|
| १८. | दुपारचा उकाडा कमी झाला होता. | | भूतकाळ |
| १९. | आपण बदल स्वीकारताना कुरकुर करतो. | | वर्तमानकाळ |
| २०. | नव्याचं स्वागत करायचा संदेश वसंतागमनाबरोबर आपण स्वीकारणार. | | भविष्यकाळ |
| २१. | स्वच्छ एवढा सूर्यप्रकाश सगळीकडे पसरला होता. | | भूतकाळ |
| २२. | जुनाट घरे मात्र सूर्यप्रकाशात चकाकत होती. | | भूतकाळ |
| २३. | मी तुझ्या पाठीशी आहे. | | वर्तमानकाळ |
| २४. | मला सारा वृत्तांत कळला आहे. | | वर्तमानकाळ |
| २५. | तो दगडाखाली जाईल. | | भविष्यकाळ |
| २६. | त्या माणसाला बाकी काही प्रश्न नव्हते. | | भूतकाळ |
| २७. | तुझ्यातली रक्त काढणे हे ही माझी जैविक कर्तव्य आहे. | | वर्तमानकाळ |
| २८. | काही मिनिटातच ते भरून येते. | | वर्तमानकाळ |
| २९. | आमच्या मुलांना विशेष ट्रेनिंग देऊ. | | भविष्यकाळ |
| ३०. | एक पहिली छान झोप झाली. | | भूतकाळ |
| ३१. | वन्य पशुपक्षी ही आपली राष्ट्रीय संपत्ती आहे. | | वर्तमानकाळ |
| ३२. | निवडण्यासाठी अनेक कसोट्या लावण्यात आल्या. | | भूतकाळ |
| ३३. | भारतातील सर्व प्रदेशात मोर पहायला मिळतो. | | वर्तमानकाळ |
| ३४. | पक्षांविषयी प्रेम वाढीस लागेल. | | भविष्यकाळ |

**कंसात दिलेल्या सूचनेनुसार काळ बदला.** **गुण: ०१**

१. अंगणात गुरे,गाई - म्हशी होत्या. (भविष्यकाल करा.)

२. आई तरातरा बाहेर आली. (वर्तमान काळ करा.)

३. शाळेची घंटा झाली. (भविष्यकाल करा.)

४. मी ते कागद घेऊन बाहेर पडले. (वर्तमान काळ करा.)

५. एका रात्री घरच्यांनी घराबाहेर काढले. (वर्तमान काळ करा.)

६. चित्रपट संथ गतीने पुढे जातो. (भूतकाल करा.)

७. आई-वडिलांना दुःख होईल. (वर्तमान काल करा.)

८. अलीच्या मनात विचार येतो. (भूतकाळ करा.)

९. शर्यतीच्या दिवस उजाडतो. (भविष्यकाळ करा.)

१०. एकच जल्लोष होतो. (भविष्यकाळ करा.)

११. प्रेक्षक सुटकेचा निःश्वास टाकतात. (भूतकाळ करा.)

१२. मला भेटल्या शिवाय करमत नाही. (भूतकाळ करा.)

१३. आपल्या नाजूक बोटांनी त्याने मला सावरले आहे. (भविष्यकाळ करा.)

१४. माझ्या आयुष्यात या स्नेहाल क्षणांना फार मोलाचे स्थान आहे. (भूतकाळ करा.)

१५. मकबऱ्याने माझे सुख पाहिले आहे, तसेच दुःखही अनुभवले आहे. (भविष्यकाळ करा.)

१६. हसू - असूंचा खेळ अविरत चालला आहे. (भूतकाळ करा.)

**काळ बदला. (उत्तर)**

१. अंगणात गुरे,गाई - म्हशी असतील.

२. आई तरातरा बाहेर येते.

३. शाळेची घंटा होईल.

४. मी ते कागद घेऊन बाहेर पडते.

५. एका रात्री घरचे घराबाहेर काढतात.

६. चित्रपट संथ गतीने पुढे गेला.

७. आई-वडिलांना दुःख आहे.

८. अलीच्या मनात विचार आला.

९. शर्यतीच्या दिवस उजाडणार.

१०. एकच जल्लोष होईल.

११. प्रेक्षकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

१२. मला भेटल्या शिवाय करमत नव्हते.

१३. आपल्या नाजूक बोटांनी त्याने मला सावरले असेल.

१४. माझ्या आयुष्यात या स्नेहाल क्षणांना फार मोलाचे स्थान होते.

१५. मकबऱ्याने माझे सुख पाहिले असेल, तसेच दुःखही अनुभवले असेल.

१६. हसू - असूंचा खेळ अविरत चालला होता.

१७. अखेर दुसरे पॅन घेऊन काम सुरू केले. (भविष्यकाळ करा.)

१८. त्याचे वळण काही पहिल्या पेना सारखे नाही. (भविष्यकाळ करा.)

१९. थंडी दूर पळाली होती. (वर्तमान काळ करा.)

२०. उष्मा वाढू लागला होता. (भविष्यकाळ करा.)

२१. आपण त्यातच अभिमान बाळगतो. (भूतकाळ करा.)

२२. आपण वाढत्या वयाबरोबर तजेला हरवून बसतो. (भविष्यकाळ करा.)

२३. रस्त्यावरून गर्दी, गोंगाट वाहत होता. (वर्तमान काळ करा.)

२४. मुलाने नजरे पुढचा कागद खिशात घातला. (वर्तमान काळ करा.)

२५. पोरे सकाळपासून उपाशी आहेत. (भूतकाळ करा.)

२६. समोरच्या रस्त्यावरची वर्दळ वाढत होती. (भविष्यकाळ करा.)

२७. तो दगडाखाली जाईल. (भूतकाळ करा.)

२८. तो दगड खड्डयाबाहेर आला. (वर्तमान काळ करा.)

२९. किती प्राणी मारून खातो. (भूतकाळ करा.)

३०. ते माझे जैविक कर्तव्य आहे. (भूतकाळ करा.)

३१. काही मिनीटातच ते भरून येते. (भविष्यकाळ करा.)

३२. ते काळजी आम्ही घेतो. (भूतकाळ करा.)

३३. अशावेळी संताप येतो. (भुतकाळ करा.)

३४. मग ते सहकार्य पर्व सुरु झालं. (वर्तमान काळ करा.)

**काळ बदला. (उत्तर)**

१७. अखेर दुसरे पॅन घेऊन काम सुरू करेन.

१८. त्याचे वळण काही पहिल्या पेना सारखे नसेल.

१९. थंडी दूर पळाली आहे.

२०. उष्मा वाढू लागला असेल.

२१. आपण त्यातच अभिमान बाळगला.

२२. आपण वाढत्या वयाबरोबर तजेला हरवून बसू.

२३. रस्त्यावरून गर्दी, गोंगाट वाहत आहे.

२४. मुलाने नजरे पुढचा कागद खिशात घालतो.

२५. पोरे सकाळपासून उपाशी होते.

२६. समोरच्या रस्त्यावरची वर्दळ वाढत असेल.

२७. तो दगडाखाली गेला.

२८. तो दगड खड्डयाबाहेर येतो.

२९. किती प्राणी मारून खाल्ले.

३०. ते माझे जैविक कर्तव्य होते.

३१. काही मिनीटातच ते भरून येईल.

३२. ते काळजी आम्ही घेतली.

३३. अशावेळी संताप आला.

३४. मग ते सहकार्य पर्व सुरू होत आहे.

३५. भारत सरकारने मोर या पक्षाला मान्यता दिली. (वर्तमान काळ करा.)

३६. त्यात गरुड, हंस, महासारंग, आदी पक्ष्यांची ही नावे होती. (भविष्यकाळ करा.)

३७. सर्व कसोट्यात मोर उत्तीर्ण झाला. (वर्तमान काळ करा.)

३८. मोर भारतात सर्वत्र पाहायला मिळतो. (भविष्यकाळ करा.)

३९. शेपटी थोडी खाकी रंगाची असते. (भूतकाळ करा.)

४०. त्याच्या पंखावर हिरव्या रंगाचे डोळे असतात. (भविष्यकाळ करा.)

४१. साधारणपणे एक महिन्यात लांडोर आपली अंडी उबवते. (भूतकाळ करा.)

४२. लांडोरीला पिलांचे संरक्षण करावे लागते. (भविष्यकाळ करा.)

४३. तो आपला चारा दिवसा शोधतो. (भूतकाळ करा.)

४४. सागर दर्यात एक साखर भेट आहे. (भविष्यकाळ करा.)

४५. त्यांनी डचांकडून या बेटाचा कब्जा घेतला. (वर्तमान काळ करा.)

४६. आपल्या भूमीच्या बहुरंगी निसर्गसौंदर्याला शोभले. (वर्तमान काळ करा.)

४७. इतिहासाची एक परिक्रमा पूर्ण झाली. (वर्तमान काळ करा.)

४८. आम्ही एक मोटर बोटीत बसून या बेटावर गेलो. (भविष्यकाळ करा.)

४९. कोरल ही दिसायला वनस्पती दिसते. (भूतकाळ करा.)

५०. निळी कमळे फुललेली. (भविष्यकाळ करा.)

काळ बदला. (उत्तर)

३५. भारत सरकार मोर या पक्षाला मान्यता देते.

३६. त्यात गरुड, हंस, महासारंग, आदी पक्ष्यांची  ही नावे असतील.

३७. सर्व कसोट्यात मोर उत्तीर्ण आहे.

३८. मोर भारतात सर्वत्र पाहायला मिळेल.

३९. शेपटी थोडी खाकी रंगाची होती.

४०. त्याच्या पंखावर हिरव्या रंगाचे डोळे असतील.

४१. साधारणपणे एक महिन्यात लांडोरीने आपली अंडी उबवली.

४२. लांडोरीला पिलांचे संरक्षण करावे लागेल.

४३. त्याने आपला चारा दिवसा शोधला.

४४. सागर दर्यात एक साखर भेट असेल.

४५. ते डचांकडून या बेटाचा कब्जा घेतात.

४६. आपल्या भूमीच्या बहुरंगी निसर्गसौंदर्याला शोभतो.

४७. इतिहासाची एक परिक्रमा पूर्ण होत आहे.

४८. आम्ही एक  मोटर बोटीत बसून या बेटावर जाऊ.

४९. कोरल ही दिसायला वनस्पती दिसली.

५०. निळी कमळे फुलतील.

**वाक्प्रचार व त्यांचे अर्थ** **गुण: ०२**

| अ क्र | वाक्प्रचार | सराव | उत्तर |
|---|---|---|---|
| १. | अक्षरशत्रू असणे | | निरक्षर असणे |
| २. | भुरळ  घालणे | | आकर्षित करणे |
| ३. | यक्षप्रश्न असणे | | समस्या असणे |
| ४. | आघाडी सांभाळणे | | जबाबदारी सांभाळणे |
| ५. | जीव तोडून पळणे | | सर्वशक्तीनिशी पडणे |
| ६. | कोलाहल माजणे | | मोठा आवाज होणे |
| ७. | तोंड देणे | | सामना करणे |
| ८. | झुंबड उडणे | | गर्दी होणे |
| ९. | भोवळ येणे | | चक्कर येणे |
| १०. | भानावर येणे | | शुद्धीवर येणे |
| ११. | आकांत माजणे | | खूप दुःख होणे |
| १२. | कावरेबावरे होणे | | भय, राग यांनी चकित होणे |
| १३. | साद घालणे | | हाक मारणे |
| १४. | मन गलबलणे | | घाबरून जाणे किंवा गोंधळून जाणे |
| १५. | दत्त म्हणून उभे असणे | | अचानक पणे समोर उभे राहणे |
| १६. | गयावया करणे | | विनवणी करणे |
| १७. | शिरशिरी येणे | | अंगावर बारीक काटा येणे |

| अ क्र | वाक्प्रचार | सराव | उत्तर |
|---|---|---|---|
| १८. | कात टाकणे | | पुन्हा ताजेतवाने होणे |
| १९. | समरस होणे | | एकरूप होणे |
| २०. | खपवून घेणे | | सहन करणे |
| २१. | भांबावून जाणे | | गोंधळून जाणे |
| २२. | स्तब्ध उभा राहणे | | शांत उभा राहणे |
| २३. | गाऱ्हाणी सांगणे | | तक्रार करणे |
| २४. | कागदात तोंड खुपसणे | | सतत वाचन लेखन करणे |
| २५. | तोंडाकडे पाहणे | | गंमत पाहणे |
| २६. | हात आखडणे | | दान देण्यास कमी करणे |
| २७. | मुबलक असणे | | भरपूर असणे |
| २८. | टेहळणी करणे | | दुरून पाहणी करणे अथवा नजर ठेवणे |
| २९. | सांगोपांग विचार करणे | | सर्व बाजूंनी विचार करणे |
| ३०. | कसोटी लावणे | | पारखणे सुरक्षित |
| ३१. | जोपासना करणे | | सुरक्षित ठेवणे |
| ३२. | जीवापाड प्रेम करणे | | खूप प्रेम करणे |
| ३३. | मनसोक्त पोहणे | | स्वैर पोहणे |
| ३४. | उज्ज्वल भविष्य असणे | | भविष्यात चांगले दिवस येणे |

## समानार्थी शब्द

गुण:०१

| अक्र | शब्द | सराव | उत्तर | अक्र | शब्द | सराव | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बालपण | | लहानपण | १८ | गुंगी | | भुरळ |
| २ | गर्व | | अभिमान | १९ | निराळी | | अनोखी |
| ३ | विद्यालय | | शाळा | २० | सक्तीचे | | अनिर्वाय |
| ४ | वृक्ष | | झाड | २१ | कुचकामी | | टाकाऊ |
| ५ | माता | | आई | २२ | कठीण प्रश्न | | यक्षप्रश्न |
| ६ | साल | | वर्ष | २३ | पळणे | | धावणे |
| ७ | खेडे | | गाव | २४ | तपास | | शोध |
| ८ | शिक्षक | | गुरुजी | २५ | सत्य | | खरे |
| ९ | पांढरा | | शुभ्र | २६ | नेहमी | | नित्य |
| १० | पहाट | | सकाळ | २७ | दोष | | वैगुण्य |
| ११ | पाऊस | | वर्षा | २८ | ग्लानी | | मरगळ |
| १२ | छाया | | सावली | २९ | ओळख | | परिचय |
| १३ | ममता | | माया | ३० | बेचैन | | अस्वस्थ |
| १४ | त्रास | | स्थळ | ३१ | प्रेम | | स्नेह |
| १५ | वाणी | | भाषा | ३२ | नवल | | आश्चर्य |
| १६ | विद्या | | शिक्षण | ३३ | दिन | | दिवस |
| १७ | वैरी | | शत्रू | ३४ | थोर | | मोठा |

E-GUIDANCE

| अक्र | शब्द | सराव | उत्तर | अक्र | शब्द | सराव | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | शीत | | थंड | ५२ | राग | | संताप |
| ३६ | हवा | | वारा | ५३ | कडवटपणा | | कटुता |
| ३७ | गगन | | आकाश | ५४ | मुख | | तोंड |
| ३८ | निसर्ग | | सृष्टी | ५५ | मदत | | सहकार्य |
| ३९ | धरणी | | पृथ्वी | ५६ | मुबलक | | भरपूर |
| ४० | सौंदर्य | | सुगंध | ५७ | कर्ण | | कान |
| ४१ | पुष्प | | फूल | ५८ | माथा | | कपाळ |
| ४२ | वृक्ष | | झाड | ५९ | नदी | | सरिता |
| ४३ | जीवन | | आयुष्य | ६० | रात्र | | निशा |
| ४४ | परिवर्तन | | बदल | ६१ | झोप | | निद्रा |
| ४५ | छोटा | | लहान | ६२ | संताप | | राग |
| ४६ | नजर | | दृष्टी | ६३ | चित्त | | मन |
| ४७ | सराव | | अभ्यास | ६४ | रानटी | | वन्य |
| ४८ | शेळी | | बकरी | ६५ | प्राणी | | पशु |
| ४९ | माता | | आई | ६६ | वर्तमानपत्र | | वृत्तपत्र |
| ५० | तन | | शरीर | ६७ | खग | | पक्षी |
| ५१ | दिन | | दिवस | ६८ | मासा | | मत्स्य |

E-GUIDANCE

## पुढील शब्दातील अक्षरापासून दोन अर्थपूर्ण शब्द लिहा. गुण: ०१

| | |
|---|---|
| १. संग्रहालय: | |
| २. पोटजातीचा: | |
| ३. उपकारक: | |
| ४. पक्षिसंरक्षणविषयक: | |
| ५. वजनदार: | |
| ६. उबदार: | |
| ७. तळहाताएवढे: | |
| ८. घोटभर: | |
| ९. पाऊलवाट: | |
| १०. गावाबाहेर: | |
| ११. हातावर: | |
| १२. संथगती: | |
| १३. सुरुवातीपासून: | |
| १४. राज्यपुरस्कार: | |
| १५. संतसाहित्यचिंतना: | |
| १६. धरणीतून: | |
| १७. डोंगरमाथ्यावरून: | |
| १८. हरितवसन: | |
| १९. सहजगत्या: | |
| २०. समरस: | |

E-GUIDANCE

## पुढील शब्दातील अक्षरापासून दोन अर्थपूर्ण शब्द लिहा.

| | |
|---|---|
| २१. सूर्यप्रकाशात: | |
| २२. समोर: | |
| २३. दगडाभोवती: | |
| २४. राजदरबारात: | |
| २५. संसारसंबंध: | |
| २६. विचारविनिमय: | |
| २७. वनस्पतीपासून: | |
| २८. भारताचाच: | |
| २९. प्राणिसंग्रहालय: | |
| ३०. साधारणपणे: | |
| ३१. शत्रूपासून: | |
| ३२. भारतवर्ष: | |
| ३३. सूर्योदयापूर्वी: | |
| ३४. महासागर: | |
| ३५. शतकापर्यंत: | |
| ३६. जागरण: | |
| ३७. विमानतळ: | |
| ३८. मोटरबोटीत: | |
| ३९. नयनमनोहर: | |
| ४०. जलसफर: | |

E-GUIDANCE

**शब्दांचा योग्य कर्म जुळवून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.** **गुण: ०१**

१. वाटायचं शाळेत जावंसे मला

२. बसत सर्व जेवायला मुले-मुली

३. मी घोटभर वर्गात पाणी पिऊन बसायची

४. नावाची आता जाणार चिंधी चिमणी उडून

५. काढले एका घरच्यांनी बाहेर रात्री

६. नाव त्यांनी शाळेत घातलं माझं

७. अनेक व्हायचं आई मला होते अनाथांची

८. एक चित्रपट हे आहे

९. चित्रपट जातो संथ गतीने इथपर्यंत पुढे

१०. सकाळची जहिरा ची आहे शाळा

११. दिवस उजाडतो शर्यतीचा

१२. होतो सुरू कोलाहल प्रचंड

१३. एकदाची शेवटी संपते शर्यत

१४. कमालीचा तो होतो निराश

१५. सुटकेचा प्रेक्षक टाकतात नि:श्वास

१६. करमत मला त्याला भेटल्या शिवाय नाही

१७. वाहु अरुंद पाणी पुलावरून लागतं

१८. असो मकबरा मग करून लागतो खो-खो

१९. माझ्या राज्य पुरस्कार ग्रंथाला मिळाला

२०. व्याख्यानमाला गाजल्या माझ्या

१. मला शाळेत जावंसे वाटायचं.

२. सर्व मुले-मुली जेवायला बसत.

३. घोटभर पाणी पिऊन मी वर्गात बसायची.

४. आता चिंधी नावाची चिमणी उडून जाणार.

५. एका रात्री घरच्यांनी बाहेर काढले.

६. त्यांनी माझं नाव शाळेत घातलं.

७. मला अनेक अनाथांची आई व्हायचं होते.

८. हे एक चित्रपट आहे.

९. इथ पर्यंत चित्रपट संथगतीने पुढे जातो.

१०. जहिराची शाळा सकाळची आहे.

११. शर्यतीचा दिवस उजाडतो.

१२. प्रचंड कोलाहल सुरु होतो.

१३. शेवटी एकदाची शर्यत संपते.

१४. तो कमालीचा निराश होतो.

१५. प्रेक्षक सुटकेचा नि:श्वास घालतात.

१६. मला भेटल्याशिवाय त्याला करमत नाही.

१७. अरुंद पुलावरून पाणी वाहू लागतं.

१८. मग मकबरा खो-खो करून हसू लागतो.

१९. माझ्या ग्रंथाला राज्य पुरस्कार मिळाला.

२०. माझ्या व्याख्यानमाला गाजल्या.

२१. चालला हसू-आसुंचा आहे खेळ हा अविरत

२२. काही पेन नाही मिळालं

२३. पेन हे आहे वजनदार काहीसं

२४. वेड्यासारखा तो होता बसला

२५. नवनवे कसे निसर्ग स्वीकारतो बदल

२६. फुले हसू झाडांवर लागतात

२७. हे घालत मनात वादळ सारे फेर होते

२८. स्तब्ध मान उभा करून तो राहिला खाली

२९. आर्कीची आली तेवढ्यात तेथे आई

३०. हटायला दगड तयार दूर नव्हता

३१. तो माणूस घेणारा सगळीकडे होता जमवून

३२. बंद पंखा टाकायचा करून तो

३३. जमातीतही डास इकडे व्हायची चर्चा

३४. जरा मुद्दा हटके माणसाने काढला

३५. पहिली एक झोप झाली छान

३६. राज्याचे मागवले प्रत्येक अभिप्राय

३७. मोर झाला सर्व कसोट्या त्या उत्तीर्ण

३८. मोर होतो पहाट जागा होताच

३९. त्यांच्या समृद्ध देश श्रमेने झाला

४०. परिक्रमा एक पूर्ण इतिहासाची झाली

E-GUIDANCE

२१. हा हसू-आसुंचा खेळ अविरत चालला आहे.

२२. पेन काही मिळालं नाही.

२३. हे पेन काहीसं वजनदार आहे.

२४. तो वेड्यासारखा हस्त बसला.

२५. निसर्ग नवनवे बदल कसे स्वीकारतो.

२६. झाडांवर फुले हसू लागतात.

२७. हे सारे वादळ मनात फेर घालत होते.

२८. मान खाली करून तो स्तब्ध उभा राहिला.

२९. तेवढ्यात आर्कीची आई तेथे आली.

३०. दगड दूर हटायला तयार नव्हता.

३१. तो सगळीकडे जमवून घेणारा माणूस होता.

३२. तो पंखा बंद करून टाकायचा.

३३. इकडे डास जमातीतही चर्चा व्हायची.

३४. माणसाने जरा हटके मुद्दा काढला.

३५. एक पहिली छान झोप झाली.

३६. प्रत्येक राज्याचे अभिप्राय मागवले.

३७. त्या सर्व कसोट्यात मोर उत्तीर्ण झाला.

३८. पहाट होताच मोर जागा होतो.

३९. त्यांच्या श्रमेने देश समृद्ध झाला.

४०. इतिहासाची एक परिक्रमा पूर्ण झाली.

**चुकीचा शब्द अचूक लिहा.** **गुण: ०१**

| अक्र | सराव | | उत्तर | अक्र | सराव | | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | मुख्याध्यापक | २२ | | | विशिष्ठ |
| २ | | | उशिरा | २३ | | | उत्तीर्ण |
| ३ | | | आयुष्य | २४ | | | मिरची |
| ४ | | | वैराण | २५ | | | अनुभव |
| ५ | | | शिक्षण | २६ | | | चिमणी |
| ६ | | | स्वनाथ | २७ | | | नि:श्वास |
| ७ | | | गृहिणी | २८ | | | विद्यापीठ |
| ८ | | | औषध | २९ | | | अतिथिगृह |
| ९ | | | कटाक्ष | ३० | | | वसतिगृह |
| १० | | | प्रतिकूलता | ३१ | | | कार्यालय |
| ११ | | | सुपीक | ३२ | | | विशिष्ठ |
| १२ | | | आंतरशालेय | ३३ | | | स्वीकार |
| १३ | | | स्पर्धा | ३४ | | | भूमिका |
| १४ | | | अशिक्षित | ३५ | | | दुतर्फा |
| १५ | | | प्रेक्षक | ३६ | | | आश्चर्य |
| १६ | | | संस्कृती | ३७ | | | कौतुक |
| १७ | | | ज्येष्ठ | ३८ | | | जैविक |
| १८ | | | प्रतिनिधी | ३९ | | | कर्तव्य |
| १९ | | | पुस्तक | ४० | | | नियुक्ती |
| २० | | | निर्णय | ४१ | | | संरक्षण |
| २१ | | | आशीर्वाद | ४२ | | | रक्तदान |

| खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा. | | | गुण: ०१ |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विरामचिन्हे | सराव | उत्तर |
| १ | . | | पूर्णविराम |
| २ | ; | | अर्धविराम |
| ३ | , | | स्वल्पविराम |
| ४ | ? | | प्रश्नचिन्ह |
| ५ | ! | | उदगार चिन्ह |
| ६ | : | | अपूर्णविराम |
| ७ | ‘ ’ | | एकेरी अवतरण चिन्ह |
| ८ | “ ” | | दुहेरी अवतरण चिन्ह |
| ९ | - | | संयोगचिन्ह |
| १० | — | | अपसारण चिन्ह |

E-GUIDANCE

# पत्र-लेखन

**गुण: ०४**

वार्ताहार कडून 'आपले शहर'

'फॅन्टसी लँड' उद्यानासमोरील रस्त्यावरील सिग्नल यंत्रणा नादुरुस्त.
सिग्नल यंत्रणेमधील बिघाडामुळे अपघातांची शक्यता.
रस्त्यावर वाहतूक कोंडी.

जागरूक नागरिक या नात्याने

'फॅन्टसी लँड' उद्यानासमोरील रस्त्यावरील नवीन सिग्नल यंत्रणा बसवून देण्याची मागणी करणारे पत्र मा. वाहतूक अधिकारी यांना लिहा.

'फॅन्टसी लँड' उद्यानासमोरील रस्त्यावरील ना दुरुस्त सिग्नल दुरुस्त केल्याबाबत मा. वाहतूक अधिकारी यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

दि. १५ जुलै २०१९
प्रति,
मा. वाहतूक अधिकारी साहेब,
विभागीय वाहतूक कार्यालय,
मुंबई

**विषय: फॅन्टसी लँड उद्याना समोरील रस्त्यावर नवीन सिग्नल यंत्रणा बसवून देणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मी आपणास विनंतीपूर्वक अर्ज करतो की मुंबई शहरातील नामांकित उद्यान फॅन्टसी लँड समोरील सिग्नल यंत्रणा नादुरुस्त झाली आहे. मुंबई शहराच्या औद्योगिकरणामुळे व पर्यटकांच्या गर्दीमुळे येथे नेहमीच वाहतुकीची कोंडी पाहायला मिळते. या रस्त्यावर अपघाताचे प्रमाणही वाढले आहेत.

वाहनचालकांच्या बेशिस्तपणा मुळे तसेच वाहनांच्या वेग मर्यादेमुळे येथे नेहमीच लहान-मोठे अपघात होत असतात. त्यामुळे अनेकांचा जीव जातो व काही नाहक त्रास भोगावे लागतात.

तरी महाशयांना विनंती की फॅन्टसी लँड समोरील सिग्नल यंत्रणा बसवून वाहतूक कोंडी व अपघात टाळावे. ही नम्र विनंती.

धन्यवाद.

आपला
अदी चूनेवाला
वी.पी. रोड अंधेरी (पश्चिम),
मुंबई- ४०० ०५८.

# पत्र-लेखन

शाळा व विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी ! सुवर्णसंधी !!
साफल्य बुक डेपो, नाशिक, यांच्याकडून माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांना
आगळीवेगळी आदरांजली
वाचन प्रेरणा दिनानिमित्त कोणत्याही वाचनीय पुस्तकावर ५०% सवलत
१५ ऑगस्ट ते १६ ऑक्टोबर पर्यंत

स्थळ: साफल्य बुक डेपो, मंगळवार पेठ, नाशिक

विद्यार्थी या नात्याने स्वतः साठी तुमच्या आवडीच्या पुस्तकाची मागणी करणारे पत्र लिहा.

शालेय ग्रंथालय प्रमुख या नात्याने साफल्य बुक डेपोकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

E-GUIDANCE

# पत्र-लेखन

रक्तदान शिबिरात नागरिक या नात्याने तुम्हाला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहायचे आहे. त्यासाठी खालील निवेदन वाचा व त्याआधारे पत्राचा प्रारुपात केवळ मुद्दे योग्य ठिकाणी लिहा.

आदर्श विद्यालय, चंद्रपूर
ज्येष्ठ नागरिक संघातर्फे, रक्तदान शिबिराचे आयोजन
सर्व नागरिकांना सहभागी होण्याची विनंती.
स्थळ: शाळेचे सभागृह
वेळ: सकाळी ९ ते सायंकाळी
दिनांक: १५ ऑगस्ट

# पत्र-लेखन

सफवान चुनेवाला यास बालवीर म्हणून राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन
मुख्याध्यापक

सफवान चुनेवाला यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

या पुरस्काराबद्दल आनंदाची बातमी मित्राला / मैत्रिणीला कळवा.

E-GUIDANCE

# पत्र-लेखन

शाळेची सहल महाबळेश्वर येथे जात आहे.
इच्छुक विद्यार्थ्यांनी फीस सह नावे नोंदवावीत - मुख्याध्यापक

सहलीसाठी परवानगी मागणारे पत्र वडिलांना लिहा.

सहलीचे वर्णन करणारे पत्र आईस लिहा.

E-GUIDANCE

## गद्य आकलन

**गुण: ०४**

पुढील उतारा वाचून एका वाक्यात उत्तर येईल, असे चार प्रश्न तयार करा.

बालपणातील आनंद काही आगळाच असतो. तेथे भूतकाळाची फिकीर नसते. भविष्याची चिंता करण्याचे कारण नसते. कसल्याही जबाबदा-या नसतात. कसल्याही कामाच्या कटकटी नसतात, चिंता नसते. आपण प्रत्येक गोष्टीकडे नवलाईने पाहतो. काहीही करत बसावे, हसावे, रुसावे, बडबडावे, खोड्या काढाव्यात. छोटी छोटी कामे करून मोठी बक्षिसे मिळवावीत. बालपण म्हणजे अवखळपणे वाहणारा निर्मळ झरा.

जीवनातील या वसंत ऋतूचे आकर्षण प्रत्येकाला असते कारण निराशा, दारिद्र्य व अपमान यांचे सावट नसते. बालपणी सारीच मुले निष्पाप, निरागस, हसतमुख असतात. लहान मुलांचे मन म्हणजे कोरी पाटी.

१. ______________________________
२. ______________________________
३. ______________________________
४. ______________________________

पुढील उतारा वाचून एका वाक्यात उत्तर येईल, असे चार प्रश्न तयार करा.

ज्ञान मिळवण्यासाठी वाचन केले पाहिजे. छोटी छोटी पुस्तके, मुलांची मासिके वाचली पाहिजेत. तुम्हा मुलांसाठी आनंद, चांदोबा, किशोर, पराग यांसारखी मासिके निघतात. ती दर महिन्याला वाचायची सवय ठेवावी. त्यात छान छान गोष्टी, सुंदर सुंदर कविता व उत्तम माहिती असते. ती वाचून मनाला आनंद होतो. असेच तुमच्या करीता गोष्टी, कविता असलेली कितीतरी लहान पुस्तके निघाली आहेत व निघत असतात. त्यात सुंदर चित्रे पण असतात. अशी पुस्तके मन लावून वाचण्याचा ही सराव तुम्ही ठेवावा.

१. ______________________________
२. ______________________________
३. ______________________________
४. ______________________________

E-GUIDANCE

## गद्य आकलन

**गुण: ०४**

पुढील उतारा वाचून एका वाक्यात उत्तर येईल, असे चार प्रश्न तयार करा.

जीवनाची जबाबदारी ही भयानक वस्तू नाही. जर ईश्वराने निर्मिलेली जीवनाची ही सरळ योजना लक्षात घेऊन भलभलत्या वासनांना आळा घालू शकतो, तर पण जशी ती आनंदाने भरलेली वस्तू आहे, तशी ती शिक्षणाने भरलेली आहे. जो जीवनाच्या जबाबदारीला मुकला, तो सर्व शिक्षण गमवून बसला; म्हणून निखलास समजावे. पुष्कळांची अशी समजूत आहे की, लहापणापासून जीवनाच्या जबाबदारीचे भान असण्याने जर जीवन करपून जात असेल, तर जीवन ही वस्तू जगण्याच्या लायकीचीच नाही; असे म्हणावे लागेल.

१. ____________________
२. ____________________
३. ____________________
४. ____________________

पुढील उतारा वाचून एका वाक्यात उत्तर येईल, असे चार प्रश्न तयार करा.

घराच्या वातावरणातून व्यक्तित्व घडते. माझा कुटुंब संगीतप्रेमी; म्हणून मी ही संगीताच्या तालावर वाढलो. सुरात म्हटलेल्या कविता, भजन, सिनेमाची गाणी यांनी मी तानसेन झालो. रविशंकरांची सितार, बिस्मिल्लांची शहनाई, शिवकुमारांची संतुर यांच्या मृगांच्या बरसातीत मी चिंब भिजू लागलो. वाढत्या वयाबरोबर संगीताचे ज्ञान ही वाढू लागले. संगीत हा सर्वात स्वस्त छंद म्हणूनच कुठल्याही स्तरावर माणूस त्याचा आनंद लुटू शकतो. संगीताला ना स्थळाचे बंधन ना वेळचे. व्यक्तिगत तसेच सार्वजनिक मनोरंजनाचे एकमेव साधन म्हणजे संगीत.

१. ____________________
२. ____________________
३. ____________________
४. ____________________


E-GUIDANCE

# जाहिरात लेखन


**गुण: ०४**

राष्ट्रीय उद्यानातील जंगल भ्रमंती या विषयासाठी जाहिरात तयार करा.

**चला करूया भ्रमंती**



## फुलपाखरांच्या जगात



नाव नोंदणी आवश्यक

त्वरा करा ! त्वरा करा ! त्वरा करा !
मोजक्या जागा शिल्लक
राष्ट्रीय उद्यानातील जंगल भ्रमंती !
घेऊया फुलपाखरांच्या विश्वासाचा रोमहर्षक अनुभव

वयोगट: १५ ते २० वर्ष
कालावधी: दि. २५ डिसेंबर ते २७ डिसेंबर

**संपर्क: जंगल भ्रमंती संस्था**
www.junglebhramanti@gmail.com

महाराष्ट्रातील किल्ले गड भ्रमंती या विषयासाठी जाहिरात तयार करा.

E-GUIDANCE

दिवाळीची सुट्टी छंदवर्ग नाट्य या विषयासाठी जाहिरात तयार करा.

चित्रकला व चित्र प्रदर्शन या विषयासाठी जाहिरात तयार करा.

आइस्क्रीम पार्लर साठी जाहिरात तयार करा.

शाळेचा गणवेश या विषयासाठी जाहिरात तयार करा.

E-GUIDANCE

व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन या विषयासाठी जाहिरात तयार करा.

शाळेच्या प्रवेशासाठी जाहिरात तयार करा पुस्तक प्रदर्शन व विक्रीसाठी जाहिरात तयार करा.

# निबंध लेखन

**गुण: ०४**

## मी अनुभवलेला पाऊस –

पावसाळा हा सर्व हंगामातील सर्वोत्तम हंगाम मानला जातो. पावसाळयाच्या दिवसाची वाट पहात असते आणि अशाच दिवशी हवामान आनंददायी असते. पावसाळयाचा दिवस हा निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी आणि त्याबरोबर राहण्यासाठी एक परिपूर्ण दिवस आहे. पावसाळयाच्या दिवशी संपूर्ण वातावरण आनंदाने भरुन जाते. मग ती मुले, मोठी माणसे किंवा वृद्ध लोक – प्रत्येकाला हा दिवस खूप आवडतो.

गेल्या वर्षी मी जेव्हा इयत्ता पाचवीत होतो तेव्हा सकाळी मी शाळेत जाण्यासाठी उठलो आणि माझ्या शाळेत जाण्यास तयार झालो. हा दिवस पावसाळ्याचा होता, जुलै महिन्यात. बाहेर हवामान गडद आणि अंधुक होते. माझ्या मनात मी परमेश्वराला सतत प्रार्थना करत होतो की जर पाऊस पडला आणि मला शाळेत जाण्याची गरज नाही. मी माझे दूध घेतल्यानंतर आणि आईने माझा लंचबॉक्स पॅक केल्यावर मी शाळेत जाण्यासाठी तयार झालो. पण पाऊस पडला नाही आणि मला जावे लागले. माझ्या वडिलांनी मला शाळेत सोडले.

पावसाळा म्हटलं तर मला काही कविताच्या ओळी आठवायला लागल्या .....

कातर वेळचा गार वारा,<br>
तुझी स्मृती घेऊन भेटतो,<br>
मिट्ट काळोख येता गारवा,<br>
पाऊस अलगद मनात दाटतो

वर्गात मी पावसाच्या अपेक्षेने खिडकी जवळ एका बाकावर बसलो. मला वर्गात आळशी आणि वाईट वाटले आणि माझे सर्व लक्ष पावसाच्या आशेने खिडकीच्या बाहेर होते. माझ्या वर्गाच्या शिक्षकांनी सतत खिडकीबाहेर पाहत असल्यामुळे मला फटकारले आणि उपाशी राहण्यास सांगितले. माझा गणिताचा क्लास संपताच माझी इच्छा पूर्ण झाली. पाऊस सुरू झाला आणि वर्गात कोणतेच शिक्षक नव्हते. माझे डोळे आनंदाने चमकले आणि मी पावसाच्या थेंबाचा आनंद घेण्यासाठी खिडकीतून डोकावण्यासाठी माझ्या सीटवरुन उडी मारली. मी पावसाचे थेंब समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो आणि यामुळे मला खूप आनंद झाला.

वर्गातील प्रत्येकजणांना आनंदी-आनंद झाला. प्रत्येकजण उडी मारत होते, चिट-गप्पा मारत होते आणि आनंदाने हसत होते. मी आणि माझ्या काही वर्गमित्रांनी आमच्या पुस्तकांमधून काही पृष्ठे फाडली आणि कागदाच्या बोटी बनवल्या. खिडकीच्या बाहेर छोटे तळे होते आणि आम्ही आमच्या बोटी तरंगण्यासाठी तळ्यामध्ये सोडल्या. आमच्या बोटी पाण्यावर तरंगल्यामुळे त्या आम्हाला उडी मारण्यास कारणीभूत ठरल्या. आम्ही खिडकीतून पावसाचे थेंब पकडून एकमेकांवर फेकत होतो.

थोड्या वेळाने आमचे विज्ञानाचे शिक्षक वर्गात आले आणि प्रत्येकजण त्यांच्या जागेवर परत गेला. काही वेळात पाऊस जोरदार पडेल अशी अपेक्षा असल्याने त्यांनी सुट्टी जाहीर केली. आम्ही सर्व जण आमच्या जागेवरुन उतरलो. आम्ही आमची बॅग पॅक केली, आपल्या रेनकोटमध्ये प्रवेश केला आणि पावसाचा आनंद घेण्यासाठी वर्गबाहेर पळत गेलो. आम्ही पावसात उडी मारत आणि नाचत घरी परतलो.

मी थोडासा ओला झाल्यामुळे माझी आई माझ्यावर रागावली पण तिने अद्रक आणि तुळशीचे पाने टाकून गरमागरम चहा बनविला तो चहा पिऊन मला खूप आरामदायी वाटले.

माझ्या आयुष्यातील हा एक उत्तम दिवस होता. पावसाळ्याचे दिवस खरोखरच प्रत्येकाच्या जीवनात आनंद आणतात.

## निबंध लेखन

**गुण: ०४**

# माझी आई

"स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी" हे स्वामी विवेकानंदांचे वाक्य अगदीच खरं आहे. आपल्याजवळ खूप धन आहे, पण जर मायेने डोक्यावर हाथ फिरवणारी आई नाही तर मग आपले जीवन व्यर्थ आहे. जेव्हा एक बालक बोलायला शिकतो तेव्हा पहिले अक्षर तो बोलायला शिकतो ते म्हणजे आई.

माझ्या आईबद्दल मी काय सांगू. माझ्या जीवनातील सर्वात महत्त्वाची व्यक्ती आहे ती. प्रत्येक क्षणी, जीवनातील प्रत्येक कठीण वाटेवर माझ्या सोबत उभी राहते ती माझी आई. लहानपणा पासून आज पर्यंत मी तिला बघतो आहे. पहाटे सर्वप्रथम ती उठते, मला उठवते, शाळे करता तैयार करते, माझा नाश्ता बनवते, माझी बैग पैक करण्यास मदत करते। माझा डब्बा सुद्धा मी शाळेत निघायच्या आत तयारच असतो.

ही तिची रोजचीच दिनचर्या आहे। सकाळी लवकर उठणे, मला शाळेत व बाबांना ऑफिसामध्ये पाठवणे, घरकाम करणे, संध्याकाळी माझा अभ्यास घेणे व माहिती नाही आणखी किती काम ती करते ते. आणि एवढं केल्यानंतर ही कधीच तिच्या चेहरा वर तो त्रास नाही दिसत कि कधी कंटाळा नाही दिसत.

एकदा तर मला खूप ताप आला असताना ती रात्रभर माझ्या शेजारी बसून पाण्याची पट्टी माझ्या माथ्यावर ठेवत बसली होती। सदा न कदा माझ्या आवड़ीं-निवड़ींची काळजी घेत असते माझी आई.

मला जे चांगले संस्कार लाभले आहेत ते तुझीच देणगी आहे. मी कितीही आईबद्दल लिहिले तरी ते कमीच वाटणार.. पण आईला नेहमी आनंदात ठेवणं व माझ्याकरिता घेतलेल्या कष्टांच चीज करणं हेच माझ्या जीवणाचं खरं उद्देश्य आणि लक्ष्य आहे.

## निबंध लेखन

**गुण: ०४**

# फुलाचे आत्मवृत्त

मंदिरातून नमस्कार करुन मी बाहेर पडले आणि माझे लक्ष बाहेरच्या बाजूस ठेवलेल्या मोठ्या 'निर्माल्य कलशा' कडे गेले. बऱ्याच कोमेजलेल्या फुलांनी तो कलश भरलेला होता, तरी त्यावर एक गुलाबचे सुंदर फूल होते. मनात आले, "अरे हे फूल पूर्णपणे सुकलेले नाही. अजूनही टवटवीत आहे, मग इथे कसे आले?" असा विचार करतच पुढे निघाले तोच आवाज आला,
"अग बघ ना ! मला इथे पाहून तुलाही आश्चर्य वाटल ना. माझ्या नशीबात इथे पडून राहण्याची काय दुर्दैवी वेळ आली आहे. आज सकाळपर्यंत मी या मंदिराच्या उद्यानात होतो आणि आता येथे निर्माल्याच्या ढिगाऱ्यावर."

या मंदिराच्या स्थापनेपासूनच मंदिराच्या सभोवार उदयान बनवण्यात आले. इथल्या पुजारी बुवांनाही झाडा-पाना-फुलांची मोठी आवड. ताजी फुले देवाच्या पूजेसाठी मिळतील असा विचार करुन त्यांनी व इतर भक्त मंडळींनी उद्यानात वेगवेगळी **फुलझाडे** लावली. रोज संध्याकाळी मंदिराला भेट देणाऱ्या वृद्धांनी या उद्यानाच्या हिरवळीसाठी कष्ट घेतले आणि आता एका माळीबुवांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. माळीबुवाही दिवसभर या उद्यानात खपत असतात. याच उदयानातील एका रोपावर माझा जन्म झाला.

"माळीबुवांनी खूप काळजी घेतली होती. मी जन्मले तेव्हा अगदी इवलीशी होते. अगदी छोटीशी कळी. अगदी डौलाने बागेत फुलझाडांवर विराजीत होते. पहाटेचा गार वारा माझ्याशी खेळत होता. मला रिझवत होता."

थोडे दिवस कळीच्या रूपात वावरल्यावर मग माझे रूप हळूहळू बदलू लागले. मला उत्सुकता वाटत होती की, मी कशी, केव्हा उमलेन? माझा रंग कसा असेल? भ्रमर येऊन माझ्याशी काय हितगूज करतील, असे अनेक प्रश्न मनात गर्दी करत होते.

शेवटी, आज मी पूर्ण उमलले. कालपर्यंत असणाऱ्या कळीचे एका फुलात रूपांतर झाले. एका टपोऱ्या लाल रंगाच्या गुलाबात. मला माझ्या रंगाचा, रूपाचा अभिमान वाटू लागला. मनात विचार आला की, नुसतेच झाडावर उमलून उदयानाला शोभा देणे, हे जरी माझे कर्तव्य असले तरी देवाच्या चरणांवर अर्पण झाल्याशिवाय माझ्या जन्माचे सार्थक होणार नाही.

# माझी शाळा

E-GUIDANCE

# मी पाहिलेला चित्रपट

E-GUIDANCE

# डायरी ची आत्मकथा

E-GUIDANCE

# माझा आवडता सण

E-GUIDANCE

काही निंबंध अशा स्वरूपाचे असू शकतात.

वर्नात्मक निबंध:

माझा वाढदिवस
मी पाहिलेली यात्रा
मी पाहिलेला अपघात
मी पाहिलेला सर्कस
मी केलेला प्रवास
मी पाहिलेला सामना
माझाआवडता नेता
माझा आवडता लेखक
माझे गाव

आत्मकथात्मक निबंध:

छत्रीची आत्मकथा
पिंजऱ्यातून उडालेल्या पोपटाची आत्मकथा
फळ्याची आत्मकथा
एका शेतकऱ्याचे मनोगत

!!! धन्यवाद !!!

ALL THE BEST

मुनव्वर मलिक
9768205400